"ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक
(सदस्य संख्या, प्रभाग रचना व आरक्षण)
सुधारणा आदेश - २०२२ "

# राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र

क्रमांक - रानिआ/ग्रापंनि-२०२१/प्र.क्र. ०४ /का-०८
नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा रोड,
हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०००३२.
दिनांक : २२ जुलै, २०२२

## आ दे श

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणुकांकरिता सदस्य संख्या, प्रभाग रचना व आरक्षण निश्चित करण्याकरिता समक्रमांकाच्या दि. २४ नोव्हेंबर, २०२१ च्या आदेशान्वये सविस्तर कार्यपध्दती विहित केलेली आहे.

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३/२०२१, दि. २३/०९/२०२१ अन्वये ग्रामपंचायतींमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता राखून ठेवावयाच्या जागांची संख्या एकूण जागांच्या संख्येच्या २७ टक्क्यांपर्यंत असेल, मात्र एकूण आरक्षण, पंचायतीमधील एकूण जागांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही अशा आशयाची तरतूद केली. मात्र सदर सुधारणेबाबत मा. सर्वोच्च न्यायालयामधील रिट याचिका क्र. ८४१ / २०२१, विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६ / २०२१ व रिट याचिका क्र. १३१६ / २०२१ मध्ये दि. १५/१२/२०२१ रोजी झालेल्या निर्णयानुसार जोपर्यंत राज्य शासन त्रिस्तरीय चाचणी करुन स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाचे प्रमाण निश्चित करून त्याबाबत तरतूद करत नाही तोपर्यंत आगामी सार्वत्रिक / पोटनिवडणुकांमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या जागा सर्वसाधारण म्हणून अधिसूचित करुन निवडणुका घ्याव्या लागतील असे आदेशित केले.

आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाच्या उक्त आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक (सदस्य संख्या, प्रभाग रचना व आरक्षण ) आदेश २०२१ - दिनांक २४/११/२०२१ मध्ये अंशत: सुधारणा करुन दिनांक २९/१२/२०२१ रोजी सुधारीत आदेश क्र.१ निर्गमित करण्यात आले आहेत. त्यामुळे या सुधारीत आदेशातील अ.क्र. २ मध्ये सद्यस्थितीत नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता कोणत्याही जागा देय होणार नाही अशी तरतूद करण्यात आली होती.

तसेच मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल झालेल्या पिटीशन फॉर स्पेशल लिव्ह टू अपील (सी) क्र.१९७५६/२०२१ मध्ये दि.१९ जानेवारी, २०२२ रोजी आदेशित केल्यानुसार निवडणुकांचे कामकाज विहीत कालावधीत पूर्ण करण्याच्या दृष्टीने **निवडणूक प्रभागांच्या हद्दी निश्चित करण्याचा टप्पा तत्पूर्वी पूर्ण करून घेण्याच्यादृष्टीने** आयोगाच्या दिनांक २४/११/२०२१ च्या प्रभाग रचना व आरक्षण आदेशामध्ये अंशत: सुधारणा करुन, दिनांक २७/०१/२०२२ रोजी अंशत: सुधारीत आदेश क्र.२ निर्गमित करण्यात आले होते.

आणि ज्याअर्थी, उक्त महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३/२०२१, दि. २३/०९/२०२१ चे सन २०२२ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१९, दिनांक ०१/०२/२०२२ अन्वये अधिनियमात रुपांतर करण्यात आले आहे.

आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयामधील विशेष अनुमती याचिका क्र. १९७५६/२०२१ मध्ये दि. १२ जुलै, २०२२ रोजी झालेल्या सुनावणीच्यावेळी शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांमधील नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाचे प्रमाण निश्चित करण्याकरिता गठीत केलेल्या समर्पित मागासवर्ग आयोगाने आवश्यक त्या बाबींची पूर्तता करुन दि. ७ जुलै, २०२२ रोजी आपला अहवाल शासनास सादर केल्याची बाब शासनाने अर्ज क्र. ९२६९५/२०२२ अन्वये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिली.

आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. २० जुलै, २०२२ रोजीच्या सुनावणीत राज्य निवडणूक आयोगाने यापुढील निवडणुकांमध्ये समर्पित मागासवर्ग आयोगाने केलेल्या शिफारशी विचारात घेऊन पुढील निवडणुका घेण्याबाबत आदेश दिले आहेत.

आणि ज्याअर्थी, मा. सर्वोच्च न्यायालयाने दि. २० जुलै, २०२२ रोजी दिलेल्या उपरोक्त आदेशास अनुसरुन ग्रामपंचायतींच्या निवडणुकांमध्ये नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता जागा राखून ठेवण्याच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करणे आवश्यक झाले आहे.

**त्याअर्थी,** मी, यु. पी. एस. मदान, राज्य निवडणूक आयुक्त, महाराष्ट्र, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ झेडए व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम ( सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ ) मधील कलम १० अ पोटकलम (४) नुसार मिळालेल्या व इतर प्राप्त अधिकारांचा वापर करुन ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकांकरिता सदस्य संख्या ठरविणे, प्रभाग रचना करणे व आरक्षण चक्रानुक्रमे फिरविणे याकरिता खालीलप्रमाणे आदेश देत आहे :-

१. <u>संक्षिप्त नाव:</u>

या आदेशाला " **ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक (सदस्य संख्या, प्रभाग रचना व आरक्षण) सुधारणा आदेश - २०२२** " असे संबोधिले जाईल.

२. दि. २४ नोव्हेंबर, २०२१ च्या आदेशातील मूळ मुद्दा क्र. ८ ऐवजी खालील परिच्छेद समाविष्ट करण्यात येत आहे :-

"८. **नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता आरक्षित प्रभाग निश्चित करणे :-**

समर्पित मागासवर्ग आयोगाच्या शिफारशीनुसार प्रत्येक ग्रामपंचायतीला त्याच्या एकूण जागांपैकी नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता शिफारस केलेल्या टक्केवारीच्या प्रमाणात जागा नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता देय होतील. मात्र महाराष्ट्र अधिनियम क्र. १९/२०२२, दिनांक ०१/०२/२०२२ नुसार अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग चे एकूण आरक्षण हे पंचायतीमधील एकूण जागांच्या ५० टक्क्यापेक्षा अधिक असणार नाही. "

३. दिनांक २४/११/२०२१ च्या आदेशातील मुद्दा क्र. ९.४ नुसार नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्ग महिलांसाठी जागा आरक्षित करण्याची कार्यपध्दती अलंबिण्यात यावी.

४. **मा. सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या समर्पित आयोगाच्या अहवालातील पृ.क्र. २५३ ते ७८० ग्रामपंचायतीसंबंधातील असून सदर अहवालाची प्रत सोबत जोडली आहे. सदर अहवालातील तक्यात शेवटून दुसऱ्या रकान्यामध्ये समर्पित मागासवर्ग आयोगाने त्या - त्या ग्रामपंचायतींबाबत शिफारस केलेली नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता देय जागांची टक्केवारी विचारात घेण्यात यावी. त्यानुसार नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी जागा आरक्षित करण्यात याव्यात.**

५. आयोगाने दिनांक ३०/०५/२०२२ व दिनांक ०३/०६/२०२२ रोजी दिलेल्या आरक्षण सोडतीच्या कार्यक्रमानुसार दिनांक २१/०६/२०२२ रोजी अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द केलेल्या ग्रामपंचायतीतील सदस्य संख्या विचारात घेऊन प्रत्येक ग्रामपंचायतीच्या सदस्य संख्येनुसार नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी राखीव ठेवावयाच्या जागांची परिगणना करण्यात यावी.

दिनांक २१/०६/२०२२ रोजी अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द केलेल्या ग्रामपंचायतीमधील अनु.जाती व अनु.जमातीसाठी आरक्षित जागांमध्ये कोणतेही बदल करु नयेत. मात्र सर्वसाधारण

महिला प्रवर्गासाठी यापूर्वी काढण्यात आलेली सोडत रद्द समजण्यात यावी. त्यामुळे सर्वसाधारण प्रवर्गाच्या जागांमध्ये देखील बदल होईल.

नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्ग, नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्ग महिला व सर्वसाधारण महिला प्रवर्गाच्या जागांसाठी सोडत काढण्यात यावी. त्यासाठी आयोगाच्या दिनांक २४/११/२०२२ च्या आदेशातील मुद्दा क्र. ८.१.३ , ८.१.४ , ८.१.५ ८.२ व ८.३ तसेच ९.४ व ९.५ नुसार कार्यपध्दती अवलंबावी.

६. तसेच नवनिर्मित ग्रामपंचायतींसाठी महाराष्ट्र अधिनियम क्र. १९/२०२२, दिनांक ०१/०२/२०२२ नुसार नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता राखून ठेवावयाच्या जागांची संख्या एकूण जागांच्या संख्येच्या २७ टक्क्यांपर्यंत असेल, मात्र एकूण आरक्षण, पंचायतीमधील एकूण जागांच्या ५० टक्क्यांपेक्षा अधिक असणार नाही, याची दक्षता घ्यावी.

७. दिनांक २४/११/२०२१ च्या आदेशातील मुद्दा क्र. ९ नुसार पंचायतीच्या एकूण जागांच्या ५० % जागा महिलांकरीता आरक्षित ठेवणे आवश्यक आहे.

८. वरील सुधारणांना अनुसरुन आयोगाच्या दि. २४/११/२०२१ च्या आदेशासोबतचे परिशिष्ट ६ अ (बिगर अनुसूचित/ अंशतः अनुसूचित क्षेत्रासाठी) मध्ये यासोबत जोडलेल्या परिशिष्ट १ नुसार अंशतः सुधारणा करण्यात येत आहे. **या मूळ आदेशातील परिशिष्ट ६ ब ( संपुर्णतः अनुसूचित क्षेत्रासाठी) मधील अ.क्र. ७ नुसार नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गासाठी एकही जागा आरक्षित होणार नाही. तसेच या** आदेशातील परिशिष्ट ११ नुसार ग्रामपंचायत आरक्षणाचे संपूर्ण विवरणपत्र तयार करण्यात यावे. परिशिष्ट १३ नुसार प्रारुप प्रभाग रचना व परिशिष्ट १६ नुसार अंतिम प्रभाग रचना प्रसिध्द करण्यात यावी.

( यु. पी. एस. मदान )
राज्य निवडणूक आयुक्त,महाराष्ट्र

सहपत्र :- परिशिष्ट १

प्रति,

१. अपर मुख्य सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय
२. सर्व विभागीय आयुक्त

३. सर्व जिल्हाधिकारी
४. सर्व जिल्हा परिषद, मुख्य कार्यकारी अधिकारी,
५. मा. सर्वोच्च न्यायालय व मा. उच्च न्यायालयातील राज्य निवडणूक आयोगाचे वकील
६. सर्व उप जिल्हाधिकारी (ग्रामपंचायत निवडणूक) (जिल्हा मुख्यालय)
७. सर्व उपविभागीय अधिकारी
८. सर्व तहसीलदार
९. सर्व गट विकास अधिकारी
१०. सर्व मंडळ अधिकारी
११. सर्व ग्राम सेवक
१२. सर्व तलाठी
१३. आयोगातील सर्व कार्यासने
१४. निवड नस्ती.

(क्रमांक - रानिआ/ग्रापंनि-२०२१/प्र.क्र. ०४ /का-०८, दिनांक २२/०७/२०२२ रोजीच्या आदेशासोबतचे सहपत्र)

**परिशिष्ट - १**

**सदस्य संख्या व आरक्षणाची परिगणना ( बिगर अनुसूचित/ अंशत: अनुसूचित क्षेत्रासाठी )**

**-------------- ग्रामपंचायत, तालुका------------------, जिल्हा -------------**

**सार्वत्रिक निवडणूक ---------(सन)**

७. नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाकरिता राखून ठेवावयाच्या एकूण जागा -
(स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या जागा धरुन)

( सूत्र $= \frac{\text{समर्पित मागासवर्ग आयोगाने शिफारस केलेली टक्केवारी}}{100} \times$ ग्रामपंचायतीची **एकूण सदस्य संख्या** )

टीप :- अ.क्र. ७ येथे नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्गाची गणना करताना जेथे समर्पित आयोगाने २७ % इतक्या आरक्षणाची शिफारस केली आहे. त्या ठिकाणी जागांची गणना करताना अपूर्णांक वगळण्यात यावा.

८अ) स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या एकूण जागा -

( सूत्र $= \frac{\text{एकूण सदस्य संख्या}}{2}$ )

स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या एकूण जागांची विभागणी

८ब. अनुसूचित जातीच्या स्त्रियांसाठी

( सूत्र $= \frac{\text{अनुसूचित जातीची आरक्षित सदस्य संख्या}}{2}$ )

८क. अनुसूचित जमातीच्या स्त्रियांसाठी

( सूत्र $= \frac{\text{अनुसूचित जमातीची आरक्षित सदस्य संख्या}}{2}$ )

८ड. नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाच्या स्त्रियांसाठी

( सूत्र $= \frac{\text{नागरिकांच्या मागासवर्ग प्रवर्गाची आरक्षित सदस्य संख्या}}{2}$ )

८इ. सर्वसाधारण स्त्रियांसाठी उपलब्ध होणा-या उर्वरित जागा

( सूत्र = अ.क्र. ८ (अ) - [ अ.क्र.८ ब + ८ क+ ८ ड] )

**टीप :-** स्त्रियांकरिता राखून ठेवावयाच्या जागांच्या संख्येची गणना करताना ०.५० हा अपूर्णांक पुढील संख्येस पूर्णांकित करण्यात यावा.

९. अराखीव -

( सूत्र = अ.क्र. २ - [ अ.क्र.५ + अ.क्र.६ +अ.क्र. ७ + अ.क्र.८इ] )

ग्रामविकास अधिकारी — तलाठी

दिनांक